प्रेसनोट

# 'राष्ट्रीय मतदार दिवस साजरा'

जा.क्र. ५३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २५/०१/२०१८

**भंडारा**:– पोलीस नियंत्रण कक्ष भंडारा येथील प्रांगणात आज दि. २५/०१/२०१८ चे ११.०० वाजता मा. पोलीस अधिक्षक भंडारा विनीता साहू, यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधिक्षक रश्मि नांदेडकर, पोलीस उपअधिक्षक(गृह) कुलकर्णी,यांच्या उपस्थीतीत 'राष्ट्रीय मतदार दिवस' साजरा करून मतदारांसाठी प्रतिज्ञा घेण्यात आली.

**प्रतिज्ञा–आम्ही , भारताचे नागरीक, लोकशाहीवर निष्ठा ठेवुन, याद्वारे, प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परंपराचे जतन करू आणी मुक्त नि:पक्षपाती व शांततापुर्ण वातावरणातील निवडणुकांचे पावित्र्य राखु व प्रत्येक निवडणुकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात,समाज यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करू.**

यावेळी कार्यक्रमाला राखीव पोलीस निरीक्षक पोनी. वर्मा, उपनिरीक्षक प्रधान, पोलीस शाखेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

(मपोउपनी. प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता